राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल

क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपिल क्र.१२८९/२०२२/जळगांव

अपिलार्थी	प्रतिवादी	
	जन माहिती अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकारी
श्री.तुषार दगडुलाल बाफणा, रा.१०२, शिवपार्वती कॉलनी, दत्त मंदिर, देवपूर, धुळे ता.जि.धुळे.	शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाचोरा ता.पाचोरा, जि.जळगांव.	उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाचोरा ता.पाचोरा, जि.जळगांव.

द्वितीय अपिल सुनावणी दिनांक १०/०३/२०२६

अपिलार्थी यांनी दि.०२/०३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये "जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर कोणताही निर्णय दिलेला नाही" अशी कारणे नमूद करुन आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी वगळता अन्य सर्व पक्षकार उपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी दि.०७/१०/२०२१ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"दि.०१/०१/२०१९ ते दि.०७/१०/२०२१ या कालावधीतील शासन निर्णय दि.०९/०९/२०१५ व दि.३०/०५/२०१६ नुसार हाती घेतलेल्या कामांची माहिती प्रत्येक सा.बां.उपविभागाने त्यांच्या नोटीस बोर्डावर दरवर्षी ०१ जानेवारी व ०१ जुलै रोजी प्रसिध्द करुन नोटीस बोर्डावर लावणे आवश्यक आहे. त्यानुसार आपल्या उपविभागने दि.०१/०१/२०१९, ०१/०७/२०१९, ०१/०१/२०२०, ०१/०७/२०२०, ०१/०१/२०२१, ०१/०७/२०२१, ०१/०१/२०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या माहितीच्या (कामांच्या प्रशासकीय मान्यता दिनांक, कामाची किंमत, काम पूर्ण होण्याचा कालावधी, काम पूर्ण होण्याचा दिनांक, त्या कामासाठी उपलब्ध केलेली तरतुद व खर्च, मान्य निविदांचा तपशिल, ठेकेदाराचे नाव व कामाची सद्य:स्थिती) आदी नोंद असलेली माहितीच्या सत्य प्रमाणित छायांकित प्रती मिळाव्यात."

४. आज सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी दि.१०/०३/२०२६ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, आपल्याकडे द्वितीय अपिल क्र.१२८९/२०२२/जळगांव दाखल असून जन माहिती अधिकारी, सा.बां.उपविभाग, पाचोरा यांनी द्वितीय अपिल दाखल केल्यानंतर माहिती दिली असल्या कारणाने सदरचे अपिल निकाली काढण्यास माझी काहीही हरकत नाही व याबाबत तक्रार नाही.

सबब, अपिलार्थी यांच्या उपरोक्त नमूद लेखी निवेदनाच्या अनुषंगाने आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१२८९/२०२२/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. २८६७ दिनांक - 10 APR 2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक